Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Single Blind Review / Double Blind Review

Volume - XIV | Issue - II
February - July 2026
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2026 - 8.246
(www.sjifactor.com)



Ajanta Prakashan

ISSN - 2279 - 0489
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Single Blind Review / Double Blind Review

Volume - XIV | Issue - II | February - July 2026

MARATHI PART - I

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

Impact Factor / Indexing
2025 - 8.077
www.sjifactor.com

EDITOR
Dr. Vinay Shankarrao Hatole
Assistant Professor, International Center of Excellence in Engineering
& Management (ICEEM) College, Waluj, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

PUBLISHED BY

AJANTA PRAKASHAN
Jaisingpura, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अनु.क्र. | लेख आणि लेखकचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत साहित्य आणि शाश्वत जीवनमूल्ये<br>**प्रा. संतोष बोंगाळे** | १-७ |
| २ | प्राचीन आर्थिक विचार हे राष्ट्राच्या उभारणीत व सरकारची भूमिका ठरविण्यासाठी गरजेचे<br>**प्रा. दत्तात्रय आण्णा होनमाने** | ८-१४ |
| ३ | भारतीय शाश्वत विकासामध्ये महात्मा गांधी यांचे योगदान<br>**प्रा. दिलीप आण्णा पवार** | १५-१७ |
| ४ | शाश्वत रचनेची आदर्श प्रतिकृती: किल्ले<br>**प्रा. सुधाकर वाल्मिक पवार** | १८-२२ |
| ५ | भारतीय भाषांचे संरक्षण शाश्वत विकासासाठी गुरुकिल्ली<br>**डॉ. संभाजी आण्णू शिंदे** | २३-३१ |
| ६ | प्राचीन भारतीय समाजातील वर्णव्यवस्था : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**अर्चना कमलाकर कांबळे** | ३२-३७ |
| ७ | प्राचीन भारतीय अर्थतज्ञ कौटिल्य यांचे आर्थिक विचार :एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>**डॉ. आत्माराम मुळीक** | ३८-४७ |
| ८ | लोकपरंपरा, उत्सव आणि पर्यावरणीय मूल्यांचे जतन<br>**दिपाली शंकर वाघमारे** | ४८-५४ |
| ९ | शाश्वत भारतासाठी महिला कामगारांच्या स्वास्थ्याच्या संबंधित अध्ययन<br>**कु. दिप्ती म. ब्राम्हणकर**<br>**डॉ. गोकुला भालेराव** | ५५-६१ |
| १० | मराठी साहित्यातील शाश्वत पर्यावरणीय विचार<br>**कु. दिपाली अशोक टाकसाळकर** | ६२-६६ |
| ११ | वारकरी संप्रदायातील तत्त्वज्ञान<br>**डॉ. दीपक शंकरराव जाधव** | ६७-७० |
| १२ | संत साहित्यातील शाश्वत जीवनमूल्ये<br>**डॉ. अनिता आंबोकर** | ७१-७५ |
| १३ | भारतीय ज्ञानप्रणालीचे शाश्वत विपणन विकासातील योगदान<br>**डॉ. आशा विनोद सावंत** | ७६-८१ |
| १४ | संतांच्या मूल्य विचारांची उपयुक्तता<br>**डॉ. अशोक सदाशिव तवर** | ८२-८६ |

# १. संत साहित्य आणि शाश्वत जीवनमूल्ये

**प्रा. संतोष बोंगाळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड, ता. कराड, जि. सातारा.

**सारांश**

भारतीय संस्कृती ही केवळ परंपरांची साखळी नसून ती जीवनाला अर्थ देणाऱ्या मूल्यांची समृद्ध परंपरा आहे. या मूल्यपरंपरेला लोकजीवनाशी जोडण्याचे, तिला मानवी बनविण्याचे आणि कालातीत स्वरूप देण्याचे महत्त्वाचे कार्य संत साहित्याने केले आहे. मध्ययुगीन भारतात समाज अनेक संकटांनी ग्रासलेला होता. जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, अंधश्रद्धा, कर्मकांड, आर्थिक विषमता आणि अन्याय यामुळे सामान्य माणूस भरडला जात होता. अशा अंधाऱ्या काळात संतांनी आपल्या साहित्यातून प्रकाशाचा मार्ग दाखवला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत सावता माळी यांसारख्या संतांनी ईश्वरभक्तीच्या माध्यमातून माणूसपणाचा संदेश दिला. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू हा माणूस आणि त्याचे जीवन होते. संत साहित्यात मांडलेली जीवनमूल्ये केवळ त्या काळापुरती मर्यादित न राहता आजही तितकीच उपयुक्त, मार्गदर्शक आणि आवश्यक आहेत. भारतीय सांस्कृतिक परंपरेत संत साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संत साहित्य म्हणजे केवळ धार्मिक वा आध्यात्मिक विचारांचे संकलन नव्हे, तर ते सामाजिक परिवर्तनाची, मानवमूल्यांच्या पुनर्स्थापनेची आणि नैतिक जीवनपद्धतीची व्यापक चळवळ आहे. मध्ययुगीन भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, समाज जातिभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अन्याय व विषमतेने ग्रासलेला असताना संतांनी आपल्या साहित्यातून मानवतेचा दीप प्रज्वलित केला. त्यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याची शिकवण दिली.

**कळ शब्द :** संत साहित्य, संतांची जीवन मुल्ये, समता, मानवता, सत्य, नैतिकता, कर्मवाद, आत्मसंयम व शांती.

### १. प्रास्ताविक

आजच्या जागतिकीकरण, भौतिकवाद आणि स्पर्धेच्या युगात मानव जीवन अनेक संकटांना सामोरे जात आहे—नैतिक मूल्यांची घसरण, पर्यावरणाचा ऱ्हास, सामाजिक विषमता, हिंसा, असहिष्णुता इत्यादी. अशा परिस्थितीत संत साहित्यातील शाश्वत जीवनमूल्ये अधिकच महत्त्वाची ठरतात. म्हणूनच संत साहित्य आणि शाश्वत जीवनमूल्ये यांचा अभ्यास आधुनिक काळात अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

### २. संत साहित्याची संकल्पना

संत साहित्य म्हणजे केवळ भक्तीपर, धार्मिक किंवा अध्यात्मिक साहित्य नव्हे. ते समाजसुधारणेचे प्रभावी साधन आहे. संतांनी लोकभाषेचा वापर करून आपले विचार मांडले. संस्कृतसारख्या अभिजन भाषेऐवजी मराठीसारख्या लोकभाषेतून त्यांनी अभंग, ओवी, भारुडे, गाथा, पदे, दोहे, गाथा इत्यादी साहित्यप्रकारात रचना केली. त्यामुळे संतांचे विचार थेट सामान्य जनतेपर्यंत

पोहोचले. संत साहित्याची वैशिष्ट्ये म्हणजे साधी भाषा, गहन आशय, मानवी भावनांचा सखोल विचार आणि समाजातील अन्यायाविरुद्ध स्पष्ट भूमिका. संतांनी कर्मकांडाचा निषेध केला, ढोंगी धार्मिकतेवर टीका केली आणि आचरणाधिष्ठित भक्तीचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने ईश्वर हा मंदिरात बंद नसून माणसाच्या हृदयात आणि माणसाच्या सेवेत आहे. म्हणूनच संत साहित्य हे अध्यात्म, मानवता आणि समाजसुधारणा यांचे सुंदर संमेलन ठरते.

**३. शाश्वत जीवनमूल्यांची संकल्पना**

शाश्वत जीवनमूल्ये म्हणजे अशी मूल्ये जी काळ, परिस्थिती, समाजरचना बदलली तरी आपले महत्त्व टिकवून ठेवतात. ही मूल्ये मानवी जीवनाच्या मूलभूत गरजांशी जोडलेली असतात. सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, समता, परिश्रम, आत्मसंयम, सहिष्णुता, कर्तव्यभावना ही मूल्ये मानवजातीच्या अस्तित्वासाठी अपरिहार्य आहेत. संत साहित्यात ही मूल्ये केवळ तत्त्वज्ञानाच्या पातळीवर मांडलेली नाहीत, तर ती प्रत्यक्ष जीवनानुभवातून साकारलेली दिसतात. संतांचे स्वतःचे जीवनच त्यांच्या विचारांचे उदाहरण होते. त्यामुळे संत साहित्यातील जीवनमूल्ये अधिक विश्वासार्ह आणि प्रभावी ठरतात. शाश्वत जीवनमूल्ये म्हणजे अशी मूल्ये जी काळ, स्थळ आणि परिस्थिती बदलली तरीही उपयुक्त ठरतात. ही मूल्ये मानवी जीवनाला अर्थ, दिशा आणि स्थैर्य देतात. सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, समता, न्याय, कर्तव्य, आत्मसंयम, सहअस्तित्व ही शाश्वत मूल्ये मानली जातात. म्हणूनच संत साहित्य उपदेशात्मक न वाटता अनुभवसिद्ध ठरते.

**४. संत साहित्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये**

लोकभाषेचा वापर, भक्ती आणि कर्माचा समन्वय, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज, मानवतावाद आणि समतेचा पुरस्कार, अंतर्मुखता आणि आत्मशुद्धीवर भर आदी संत साहित्याची वैशिष्ट्ये आपणास सांगता येतील. संतांनी धर्माला कर्मकांडातून मुक्त करून तो जीवनाशी जोडला. "ईश्वर मंदिरात नाही, तर माणसाच्या अंतःकरणात आहे" ही भावना संत साहित्यात वारंवार आढळते.

**अ. संत ज्ञानेश्वर आणि जीवनमूल्ये**

संत ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक मानले जातात. त्यांच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथातून कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग यांचा सुंदर समन्वय दिसून येतो. ज्ञानेश्वरांनी सांगितलेली पुढीलप्रमाणे प्रमुख जीवनमूल्ये सांगितली आहेत. कर्मयोग (निष्काम कर्म करणे) समत्वबुद्धी (सुख-दुःखात समभाव ठेवणे) विश्वात्मकता : (संपूर्ण विश्वात ईश्वराचे दर्शन) याचबरोबर "विश्वाची माझे घर" ही संकल्पना आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची आहे. ज्ञानेश्वरांनी मानव आणि निसर्ग यांचे नाते पवित्र मानले. डॉ. वि. भी. कोलते ज्ञानेश्वरांच्या कर्मयोग सिद्धांताचा आवर्जून उल्लेख करताना म्हणतात की, ''ज्ञानेश्वरांनी आध्यात्मिक क्षेत्रात सर्व वर्णाचा सारखा अधिकार मानला. भगवत गीतेचीही हीच भूमिका आहे आणि ती ज्ञानेश्वरांनी जनतेसमोर जशीच्या तशी ठेवली. भक्तीच्या क्षेत्रात जातिकुळाचा विचारच नाही. कोणी कोणत्याही जातीचा असो आणि कोणी उच्च किंवा नीच कोणत्याही कुळात जन्मला असो. त्याला भक्ती करण्याचा अधिकार आहे.'' यावरून असे लक्षात येते की संतांनी खऱ्या अर्थाने आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली होती.

**ब. संत नामदेव : समता आणि भक्ती**

संत नामदेव हे सामाजिक समतेचे मोठे प्रवक्ते होते. त्यांनी जातिभेदाला थेट आव्हान दिले. त्यांच्या अभंगांतून ईश्वरभक्ती ही जन्मावर नव्हे, तर कर्मावर आधारित असल्याचे स्पष्ट होते. संत नामदेव यांच्या साहित्यातून पुढीलप्रमाणे जीवनमूल्ये सांगितलेली दिसून येतात. जातिभेदाविरुद्ध संघर्ष, सर्व मानव समान असल्याची भावना, अंतःकरणातील भक्तीला महत्त्व इत्यादी. आजही समाजात दिसणाऱ्या भेदभावाच्या पार्श्वभूमीवर नामदेवांचे विचार मार्गदर्शक ठरतात.

**क. संत एकनाथ : सामाजिक समरसता**

संत एकनाथ हे संत परंपरेतील अत्यंत उदार आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी अस्पृश्य, उपेक्षित घटकांशी आपुलकीने वागून समाजाला समतेचा संदेश दिला. संत एकनाथ यांच्या साहित्यातून पुढीलप्रमाणे जीवन मूल्ये आढळून येतात. सहिष्णुता, क्षमाशीलता, सामाजिक सलोखा, त्यांनी रचलेल्या भारुडांमधून समाजातील दुर्गुणांवर उपरोधिक भाषेत प्रहार केला.

**ड. संत तुकाराम : सत्य आणि निर्भीडता**

संत तुकाराम हे संत साहित्यातील सर्वात प्रभावी कवी मानले जातात. त्यांच्या अभंगांतून जीवनातील कटू सत्ये निर्भीडपणे मांडली आहेत. जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले, तो चि साधु ओळखावा, देव तेथेची जाणावा' यातून तुकाराम माणुसकी हाच खरा मानवी धर्म सांगतात. संत तुकारामांच्या अभंगातून आजच्या यंत्रयुगात मानवाने सत्यवादी राहून मानवामध्ये सलोख्याचे वातावरण राहावे यासाठी उपदेश केलेला दिसून येतो. "सत्य असत्याशी मन केले ग्वाही मानियले नाही बहुमता" या उक्तीतून हाच बोध सापडतो. संत तुकारामांनीआपल्या अभंग गाथेतून अनेक जीवनमूल्ये सांगितली. सत्यप्रियता, अहंकाराचा त्याग, दांभिकतेवर प्रहार, दीन-दलितांविषयी करुणा आदी. "जगी जे ठायी नाम नाही, तेथे दुःखचि दुःख" या अभंगातून त्यांनी आध्यात्मिक रिकामेपणावर भाष्य केले आहे. शांतीपरते नाही सुख। येर अवघे ची दुःख। म्हणऊनी शांति धरा। उतराल पैल तीरा। या अभंगातून संत तुकारामांनी शांती या मूल्याचे महत्व विशद केले आहे

**इ. संत चोखामेळा : मानवी हक्कांची जाणीव**

संत चोखामेळा हे अस्पृश्य समाजातून आलेले संत होते. त्यांच्या साहित्याने सामाजिक अन्यायाची तीव्र जाणीव करून दिली. चोखामेळ्यांची मूल्ये : मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, आत्मसन्मान त्यांचे अभंग आजही सामाजिक न्यायाच्या चळवळींसाठी प्रेरणादायी ठरतात.

**ई. संत जनाबाई आणि सावता माळी**

संत जनाबाई आणि सावता माळी यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली. दैनंदिन कामातच ईश्वराचे दर्शन घडते, ही संकल्पना त्यांनी मांडली. "कांदा मुळा भाजी अवधी विठाबाई माझी" असे संत सावता माळी म्हणतात ते कर्माला प्राधान्य देताना दिसतात. आजही त्यांनी सांगितलेले जीवनविषयक मूल्ये मानवाच्या आयुष्यात त्याचा समतोल साधण्यासाठी उपयोगी पडतात. श्रमप्रतिष्ठा श्रमाची पवित्रता, साधेपणा, कर्तव्यनिष्ठा आजच्या कामाच्या तणावग्रस्त जीवनात ही मूल्ये संतुलन साधण्यास मदत करतात.

**५. संत साहित्यातील शाश्वत मुल्ये**

**१. समता आणि मानवतावाद**

संत साहित्याचे सर्वात महत्त्वाचे शाश्वत मूल्य म्हणजे समता. मध्ययुगीन समाजात जातीव्यवस्था अत्यंत कठोर होती. उच्च-नीच भेदामुळे माणसाचे माणूसपण नाकारले जात होते. अशा परिस्थितीत संतांनी निर्भीडपणे समतेचा पुरस्कार केला. संत चोखामेळा हे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजघटकातून आलेले होते. तरीही त्यांनी ईश्वरप्राप्तीचा अधिकार सर्वांना समान आहे, हे ठामपणे मांडले. संत नामदेवांनीही जातीभेद नाकारून मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारला. संत ज्ञानेश्वरांचे "अवघे विश्वची माझे घर" हे विधान संपूर्ण मानवजातीला एक कुटुंब मानणाऱ्या विचाराचे प्रतीक आहे. मानवतावाद हा संत साहित्याचा आत्मा आहे. माणूस म्हणून माणसाशी वागणे, हीच खरी भक्ती आहे, असा संदेश संत साहित्य देते. आजच्या काळातील सामाजिक विषमता, भेदभाव आणि अन्यायाच्या पार्श्वभूमीवर हा विचार अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**२. प्रेम आणि करुणा**

प्रेम आणि करुणा ही संत साहित्यातील मूलभूत जीवनमूल्ये आहेत. संत तुकारामांनी प्रेमाला सर्वोच्च स्थान दिले आहे. त्यांच्या मते प्रेमाशिवाय भक्ती कोरडी आहे आणि प्रेमाशिवाय समाज टिकू शकत नाही. करुणा ही केवळ भावना नसून ती कृतीत उतरली पाहिजे, असा संतांचा आग्रह आहे. दुःखी, पीडित, दुर्बल यांच्याविषयी सहानुभूती बाळगणे आणि त्यांना मदत करणे, हीच खरी ईश्वरसेवा आहे. संत साहित्य द्वेष, मत्सर, सूडभावना यांचा निषेध करते आणि प्रेम, क्षमा व सहवेदनेचा मार्ग दाखवते. आजच्या संघर्षमय, तणावपूर्ण समाजात प्रेम आणि करुणा या मूल्यांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते.

**३. सत्य आणि नैतिकता**

संत साहित्य सत्य आणि नैतिकतेवर विशेष भर देते. केवळ बोलण्यात नव्हे तर वर्तनातही सत्य असले पाहिजे, असा संतांचा आग्रह आहे. संत एकनाथांनी आपल्या जीवनातून आचार आणि विचार यातील सुसंगती दाखवून दिली. सत्य, प्रामाणिकपणा, नीतिमत्ता या मूल्यांमुळेच समाजात विश्वास निर्माण होतो. नैतिक अधःपतनामुळे समाज अस्थिर होतो, हे संतांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी नैतिक जीवनाचा आदर्श समाजासमोर ठेवला. आजच्या काळातील भ्रष्टाचार, स्वार्थ, फसवणूक यांसारख्या समस्यांवर संत साहित्य सत्य आणि नैतिकतेचा मार्ग सुचवते.

**४. कर्मयोग आणि परिश्रम**

संत साहित्य कर्मयोगाचा पुरस्कार करते. कर्म म्हणजे केवळ उपजीविकेचे साधन नव्हे, तर ते ईश्वरपूजनाचे माध्यम आहे, अशी संतांची धारणा होती. संत ज्ञानेश्वरांनी कर्म करत राहण्याचा आणि फलत्यागाचा उपदेश केला. संत सावता माळी यांच्यासाठी शेती हेच भक्तीचे रूप होते. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली. कोणतेही काम लहान नाही, प्रत्येक प्रामाणिक परिश्रम हे पूजनीय आहेत, हा संदेश संत साहित्य देते. आजच्या काळात कामाबद्दलची तुच्छता, आळशीपणा आणि फक्त फळावर लक्ष केंद्रित करण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. अशा वेळी कर्मयोगाचा विचार अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**५. अहिंसा आणि सहिष्णुता**

संत साहित्य हिंसेचा निषेध करते आणि अहिंसेचा पुरस्कार करते. मतभेद असले तरी सहिष्णुतेने वागावे, असा संदेश संतांनी दिला. संत नामदेवांच्या साहित्यात परोपकार, सहअस्तित्व आणि शांततेचा विचार दिसून येतो. अहिंसा म्हणजे केवळ शारीरिक हिंसेचा अभाव नव्हे, तर मन, वाणी आणि कृतीतून कोणालाही इजा न पोहोचवणे, असा व्यापक अर्थ संत साहित्य देते. समाजातील शांतता, सलोखा आणि स्थैर्यासाठी ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत.

**६- आत्मसंयम आणि साधेपणा**

संत साहित्य भोगवादाच्या विरोधात आत्मसंयम आणि साधेपणाचा मार्ग दाखवते. संत जनाबाईंचे जीवन साधे, कष्टाळू आणि भक्तीपूर्ण होते. त्यांनी आपल्या जीवनातून समाधानाचे खरे स्वरूप दाखवले. " मन करा रे प्रसन्न | सर्व सिद्धीचे कारण" असे संत एकनाथ महाराज आवर्जून सांगतात. अतिभोगामुळे माणूस अस्वस्थ होतो, तर संयमित जीवनामुळे अंतःशांती मिळते, हे संत साहित्य सांगते. आजच्या उपभोगप्रधान संस्कृतीत आत्मसंयमाचे महत्त्व अधिक वाढले आहे. मनावर ताबा असेल तर आपणास दुखापासून दूर राहता येते. कारण मानवी जीवनामध्ये सर्वत्र दुःख असल्याचे संत तुकाराम "सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे" या चरणातून सांगतात. संतसाहित्यामुळे आत्मज्ञान प्राप्त झालेला माणूस चांगला समाज निर्माण करू शकतो. संतसाहित्य डोळे उघडायला मदत करतो, हे साहित्य प्रत्येकापर्यंत जाईल यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

**६. आधुनिक काळातील संत साहित्यातील शाश्वत जीवनमूल्यांचे महत्त्व**

आजचा समाज तंत्रज्ञानप्रधान, स्पर्धात्मक आणि वेगवान आहे. भौतिक प्रगतीसोबतच नैतिक अधःपतन, सामाजिक दुरावा, मानसिक ताण, पर्यावरणीय संकटे वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत संत साहित्यातील शाश्वत जीवनमूल्ये मार्गदर्शक ठरतात. समता आणि मानवतावाद सामाजिक न्यायाच्या संकल्पनेशी सुसंगत आहेत. प्रेम, करुणा आणि सहिष्णुता सामाजिक ऐक्य निर्माण करतात. कर्मयोग, परिश्रम आणि आत्मसंयम शाश्वत विकास आणि पर्यावरण संतुलनाशी जोडलेले आहेत. त्यामुळे संत साहित्य आधुनिक काळातही तितकेच उपयुक्त आहे. आजच्या युगात नैतिक अधःपतन, पर्यावरणीय संकट, सामाजिक तणाव, मानसिक अस्थैर्य आदी सर्वच समस्यांवर संत साहित्य उपाय सुचवते. आत्मसंयम, साधेपणा, सहअस्तित्व, करुणा ही मूल्ये आधुनिक जीवनाला दिशा देतात. शाश्वत विकासाच्या संकल्पनेतही संत साहित्याचे विचार उपयुक्त ठरतात, कारण ते निसर्ग आणि मानव यांचा समतोल राखण्यावर भर देते. संत साहित्य आपणास आधुनिक जीवनाचे जीवनशिक्षण बहाल करते. शालेय व उच्च शिक्षणात संत साहित्याचा समावेश जर आपण केला तर नैतिक जाणीव, सामाजिक जबाबदारी, आत्मपरीक्षणाची सवय सहज विकसित होऊ शकते. केवळ ज्ञान नव्हे, तर सद्गुणी नागरिक घडवण्याचे काम संत साहित्य करते.

**७. निष्कर्ष**

१. संत साहित्य हे भारतीय समाजाच्या नैतिक आणि सांस्कृतिक जडणघडणीचे अमूल्य धन आहे. त्यामध्ये मांडलेली शाश्वत जीवनमूल्ये मानवाला माणूसपण शिकवतात, समाजाला एकत्र बांधतात आणि जीवनाला अर्थ देतात.

२. आजच्या युगात मानव अधिक स्वार्थी झाला. जीवनशैली बदलली, साधने बदलली तरीही मानवी जीवनासाठी आवश्यक असलेली मूल्ये बदललेली नाहीत.

३. संत साहित्य हे केवळ भूतकाळाचे वैभव नसून वर्तमान आणि भविष्याचा मार्गदर्शक दीपस्तंभ आहे.

४. समताधिष्ठित, मानवतावादी आणि मूल्याधिष्ठित समाजनिर्मितीसाठी संत साहित्यातील शाश्वत जीवनमूल्यांचा अंगीकार करणे ही काळाची अपरिहार्य गरज आहे.

५. संतांनी समाजाला आत्मशुद्धी, समता, प्रेम आणि मानवतेचा मार्ग दाखवला. भौतिक प्रगतीसोबत नैतिक अधिष्ठान आवश्यक आहे आणि ते संत साहित्य पुरवते.

६. संत साहित्य केवळ भूतकाळातील वारसा नसून, वर्तमान आणि भविष्याचा दीपस्तंभ आहे.

७. मूल्याधिष्ठित, शांततामय आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी संत साहित्याचे विचार आत्मसात करणे ही काळाची गरज आहे.

**८. समारोप**

संत साहित्यातून आजच्या समाजजीवनाला आकार देणारी आणि मानवतेचा संस्कार देणारी अनेक जीवन मुल्ये सापडतात. जि मानवी जीवनाचे दीपस्तंभ आहेत.सर्वच संतांनी आपल्या साहित्यातून सर्व माणसे ही एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, हा विचार संतांनी मांडला. जातीपातीचा भेद नाकारून 'विश्वची माझे घर' असा वैश्विक बंधुभावाचा संदेश दिला. "आधी केले मग सांगितले" या उक्तीप्रमाणे संतांनी स्वतःच्या आचरणातून नीतिमत्ता शिकवली. सद्गुण, संयम आणि सत्कर्माद्वारे मानवी जीवन समृद्ध करण्यावर भर दिला. संतांनी प्राणिमात्रांवर दया करणे हेच खरे पुण्य मानले. "जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले" या ओळीतून दुसऱ्याच्या दुःखात धावून जाण्याचे मूल्य तुकोबांनी अधोरेखित केले. संतांनी संसार सोडून संन्यास घेण्याऐवजी, संसारात राहून कष्टाने आणि प्रामाणिकपणे जगण्याचे महत्त्व सांगितले. संत एकनाथांनी कौटुंबिक कर्तव्ये पार पाडत भक्ती करण्याचा आदर्श मांडला. अज्ञान, अंधश्रद्धा आणि अनिष्ट रूढींविरुद्ध संतांनी प्रखर प्रहार केला. संत गाडगे महाराजांनी स्वच्छतेचा आणि शिक्षणाचा आग्रह धरून आधुनिक काळातील प्रबोधन केले. संताचे विचार हे केवळ आध्यात्मिक नसून ते व्यावहारिक जीवनासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण युगात संतांनी सांगितलेली शांती, संयम आणि परोपकार ही मूल्ये मानसिक समाधानासाठी आणि सामाजिक सलोख्यासाठी आवश्यक ठरतात.

**९. संदर्भसूची**

१. डॉ. विष्णू भिकाजी कोलते- मराठी संताचे सामाजिक कार्य, 1984

२. डॉ. य .मु. पठाण, - मध्ययुगीन संत साहित्यः काही आयाम, 2003

३. गं. बा. सरदार, - संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८२

४. डॉ, मुकुंद दातार वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००८

५. भालचंद्र नेमाडे (संपा.), संत चोखामेळा – व्यक्ती आणि वाड्मय,

६. डॉ. सदानंद मोरे, तुकाराम दर्शन', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९९६

७. डॉ. रा. चिं. ढेरे, 'श्री विठ्ठल: एक महासमन्वय' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८४

८. पं. महादेवशास्त्री जोशी, 'भारतीय संस्कृती कोश (खंड ९)', भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, १९७६

९. डॉ. निर्मलकुमार फडकुले, 'संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४

१०. मराठी विश्वकोश (खंड १८): 'संत साहित्य' लेख, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, २०१५ (ऑनलाईन आवृत्ती).

११. लोकराज्य (संत विशेषांक): माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, २०१४.